**प्रताप महाविद्यालय (स्वायत्त)**
**मराठी विभाग**
**शैक्षणिक वर्ष २०२३ - २०२४**
**चर्चासत्र अहवाल**

- **चर्चासत्र "बा! तथागता : मानवतावादी सौंदर्यशास्त्र"**

मराठी विभागाच्या वतीने ११ एप्रिल २०२४ रोजी डॉ. म. सु. पगारे लिखित 'बा! तथागता' या विशाल काव्यावर आधारित चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना आधुनिक मराठी काव्य, समीक्षा परंपरा आणि मानवतावादी सौंदर्यशास्त्र यांचा सखोल परिचय करून देणे हा होता.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कबचौउमविचे प्रथम कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे उपस्थित होते. डॉ. म. सु. पगारे यांनी बीजभाषणात 'बा! तथागता' या काव्यातील तात्त्विक भूमिका, सामाजिक वास्तव आणि मानवी मूल्यांचे विश्लेषण केले. त्यानंतर डॉ. संजीव गिरासे, जयसिंग वाघ आणि धनराज धनगर यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीद्वारे काव्याचे विविध पैलू उलगडले.

या प्रसंगी डॉ. रमेश माने संपादित 'बा! तथागता : मानवतावादी सौंदर्यशास्त्र' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. या चर्चासत्रामुळे विद्यार्थ्यांना संशोधनात्मक दृष्टिकोन, समीक्षा लेखन आणि वैचारिक चिंतनाची प्रेरणा मिळाली.



**कबचौउमविच्या भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्राचे संचालक डॉ. म. सु. पगारे बीजभाषण करताना.**



**कबचौउमविचे प्रथम कुलगुरू डॉ. एन. के. ठाकरे अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना.**

डॉ. रमेश माने

प्रमुख- मराठी विभाग, प्रताप महाविद्यालय (स्वायत्त) अमळनेर.